









# आर.टी.ई.२५ % ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया (वर्ष:-२०२१-२०२२)

## प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे.

टीप:- आर.टी.ई. २५ % online प्रवेशाकरिता लागणारी सर्व कागदपत्रे ही पालकांनी online प्रवेश अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतचीच असावीत त्यानंतरची कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्राचा प्रकार | वैध कागदपत्रांची सूची |
|---|---|---|
| १ | रहिवासाचा/ वास्तव्याचा पुरावा (सर्व प्रवेशपात्र बालकांकरिता) | रेशनिंग कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स (वाहन चालविण्याचा परवाना.), वीज/ टेलिफोन बिल देयक, पाणी पट्टी, प्रॉपर्टी टॅक्स देयक/ घरपट्टी, गॅस कार्ड , बँक पासबुक ,आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट .या पैकी कोणतेही एक. ही कागदपत्रे निवासी पुरावा म्हणून नसतील तरच दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनामा हा निवासी पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. |
| २ | सामाजिक वंचित जात सवर्गातील असल्यास प्रमाणपत्र (वडिलांचे/बालकाचे ) | उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता नाही. तहसीलदार/ उपजिल्हाधिकारी/उपविभागीय महसूल अधिकारी यांचे प्रमाणपत्र.पालकाचा (वडिलांचा/बालकाचा)जातीचा दाखला आवश्यक . परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| ३ | दिव्यांग असल्यास आवश्यक कागदपत्रे | जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधीक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र. |
| ४ | HIVबाधित/प्रभावित असल्यास आवश्यक कागदपत्रे | जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकीय अधीक्षक ,अधिसूचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे प्रमाणपत्र |
| ५ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्यास उत्पन्नाचा दाखला | तहसीलदार दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र,salary स्लीप,कंपनीचा किंवा Employer चा दाखला, (आर्थिक वर्ष २०१९-२०२० किंवा २०२०-२१ मार्च अखेरचे एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेले) |

| | | |
|---|---|---|
| | | उत्पन्नाचा दाखला हा परराज्यातील ग्राह्य धरण्यात येणार नाही . |
| ६ | जन्माचा दाखला (सर्व प्रवेशपात्र बालकांकरिता) | ग्रामपंचायत /न.पा./ म.न.पा. यांचा दाखला / रुग्णालयातील ANM रजिस्टर मधील दाखला / आंगणवाडी / बालवाडीतील रजिस्टर मधील दाखला / आई,वडील अथवा पालकांनी प्रतिज्ञा पत्राद्वारे केलेले स्वयंनिवेदन. |
| ७ | घटस्फोटित महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)न्यायालयाचा निर्णय.<br>२)घटस्फोटित महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ८ | न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा.<br>२)घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ९ | विधवा महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)पतीचे मृत्यूपत्र (प्रमाण पत्र)<br>२) विधवा महिलेचा /बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| १० | एकल पालकत्व असल्यास (single parent) आवश्यक कागदपत्रे | आई किंवा वडील या पैकी निवडलेल्या व्यक्तीची कागदपत्रे ग्राह्य . |
| ११ | अनाथ बालके असल्यास आवश्यक कागदपत्रे | १)बालगृह/अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.<br>२)जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील |

